## महिन्याचा विचार

### साधकसेवा

तळमळीने ईशप्राप्तीसाठी प्रयत्न करणारे साधक गुरूदेवांसाठी खऱ्या अर्थाने ''देव'' होते. अशांसाठी गुरूदेवांनी जीवन व्यतीत केले. उतारवयात पुत्रप्राप्ती झालेल्या बालकासाठी सारं प्रेम उधळून लावणाऱ्या, कोणताही त्याग करण्यासाठी तयार असणाऱ्या आणि परतफेडीची अपेक्षा नसणाऱ्या बापाशीच त्यांची तुलना करता येईल. आपलं आयुष्य त्यांनी आश्रमातील साधकांच्या सुखसोयींसाठी आणि त्यांच्या अध्यात्मिक साधनेत व्यत्यय येऊ नये यासाठीच व्यतीत केले. अन्न, वस्त्र, निवारा आणि औषधोपचार यांची साधकांना ददात पडू नये म्हणून गुरूदेव रात्रंदिवस चिंतामग्न असत. अगदी किरकोळ डोकेदुखी असलेला आश्रमवासी त्याच्या नजरेस पडला तरी ते त्याला सांगत – ''कृपा करून विश्रांती घे.'' त्यापाठोपाठ डॉक्टर आणि काही इतर आश्रमवासी साधकांना ते सुश्रुषेसाठी पाठवीत. मात्र स्वत: आजारी असले की डॉक्टरांनी दिलेला विश्रांतीचा सल्ला ते फेटाळून लावीत. ''मी ठीक आहे.'' असे त्यांचे म्हणणे असे. या एकाच बाबतीत गुरूदेवांच्या



''कथनी आणि करणी'' यामध्ये फरक असे. स्वत:च्या सुखसोयींकडे पुर्णपणे दुर्लक्ष करणारे गुरूदेव स्वार्थत्यागाची मूर्ती होते. मात्र बाकीच्यांना त्यांचे सांगणे असे ''प्रकृतीची काळजी घ्या, हेळसांड करू नका. '' ईशप्राप्तीची तळमळ असणाऱ्या साधकांवर त्यांचे असे अतोनात प्रेम असे.

जगातील प्रेमख पालकही जे करणार नाहीत, ते सारं काही गुरूदेव अशा वेळी करीत असत. एखाद्या शिष्यामध्ये कोणत्याही कलेचा एखादा जरी अंश आढळला की त्या कलेच्या परिपूर्णतेसाठी ते स्वत:ला वाहून घेत. रात्रंदिवस ते याच विचारात घालवीत की अशा कलेचा मानवतेसाठी कसा उपयोग करून घेता येईल? आनंदकुटीरमध्ये त्यांनी यासाठी खास सोय करून ठेवली होती. कागद निर्मितीचे तंत्र माहित असलेला एक तरूण एकदा आश्रमात आला. दुसऱ्या दिवशी गुरूदेवांनी आश्रमात एक खड्डा खणण्यासाठी सांगितले आणि कागदासाठी लागणारी सर्व कच्ची सामुग्री मागविली. खरं तर या तरूणाची त्यांना काहीही माहिती नव्हती तरी त्यांनी सदर तरूणाच्या प्रयोगांना परवानगी दिली.



एकदा एक संगीत जाणणारी व्यक्ती आश्रमात दाखल झाली. लगेच दुसऱ्या दिवशी त्याच्यासाठी तबला–पेटी मागविण्यात आली. अशा सगळ्या उपक्रमांमध्ये ते इतक्या उत्सुकतेने आणि उत्साहाने भाग घेत की जणू ते याच्याच प्रतिक्षेत असावेत असे वाटायचे. ज्या क्षेत्रात एखादी व्यक्ती तज्ञ असे त्या क्षेत्राबद्दलही गुरूदेव काही कालांतराने अशा सूचना करीत की कोणालाही वाटे–अरे, यांना सारंकाही येतं.

आश्रमाच्या फोटोग्राफी विभागाची कहाणी अशीच आहे. १९४७ मध्ये स्वामी सरदानंद आश्रमात येऊन दाखल झाले, त्यावेळी त्यांनी पुढाकार घेतला. योगायोगाने सौ. शामाश यांनी त्याचवेळी एक महागडा कॅमेरा आश्रमास भेट दिला आणि करिनाने तिचा एक कॅमेरा स्टुडिओला भेट दिला. त्यानंतर दस्तुरखुद्द गुरूदेवांनी स्टुडीओच्या कामकाजाबद्दल बारकाईने सूचना दिल्या.(क्रमश:)

**- Swami Sivananda's Integral Yoga**
**By Swami Venkatesananda**

**17th online Elocution Competition took place on September 26, 2021. As many as 25 participants sent their videos and participated. Shri Amar Puranik (Daily Tarun Bharat, Solapur) and Dr Arya Joshi (Pune) worked as Assessors.**

**The result is as follows-**

1) **First Prize- SONAL SURVE**
(IMED, Pune)

2) **Second Prize- ADITYA JAVALKAR**
(Symbiosis School, Pune)

3) **Third Prize- DNYANADA DHARANKAR**
(S. P. College, Pune)

4) **Special Prize- PRAJAKTA PENDSE**
(S. P. College, Pune)

5) **Consolation Prize One- ACHIRA SHAH**
(Sangmeshwar College, Solapur)

6) **Consolation Prize Two- AAKARSHA GUPTA** (IMED, Pune)

Congratulations to all the WINNERS and participants. Big thank you to Assesors.

**- ORGANIZER**



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

* सप्टेंबर महिन्याचा सत्संग दि. १२ ला ऑनलाईन झाला.
* ''दिव्य जीवन'' या आपल्या मासिक पत्रिकेचा सप्टेंबर महिन्याचा अंक परिवारातील सदस्यांना हार्ड आणि सॉफ्ट कॉपी तसेच व्हॉट्सअप द्वारे पाठविण्यात आला.
* देणगी –
  १) शाखेचे नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. रामप्रसादजी यांनी रू. १०,०००/– देणगी रूपाने शाखेला दिले.
  २) आपल्या शाखेचे दिवंगत अध्यक्ष श्री. भ.रा. नाईक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ रू. ११,०००/– देणगी रूपाने शाखेला मिळाले.

## पुणे शाखेचा पत्ता

श्री.नितीन देशपांडे
‘ईशावास्य’ प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के. विश्व, धायरी, पुणे ४११०६८,
मो.नं. ९८५०९३१४१७

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



वर्ष १६/अंक १०
ऑक्टोबर २०२१

What does the owner of a poultry farm do if the chickens run around to eat a lot of garbage? He throws some grains in front of them to lightly shave their heads. Slowly they give up the bad habit of eating dirt. Similarly, when the mind is chasing evil things around the corner, let it taste spiritual joy slowly by studying the Holy Scriptures, chanting God's name, meditation, contemplation and meditation. Maya is like a great act. Work, anger, greed, illusion, pride, jealousy, hatred and ego are the teeth of this great master. All the people of the world get stuck in this tooth of his and become tick tick. But those who own the power of purity, humility, love, bravery, devotion, thinking, they are free from that teeth by the grace of Bhagavat.

**- Swami Sivananda**